पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८,
माहिती व तंत्रज्ञान विभाग,
क्र. मातं/६/कावि/ ८४/२०१८
दिनांक २८/०२/२०१८

# परिपत्रक

**विषय** – मनपाचे संकेतस्थळावर व ई-निविदा संगणक प्रणालीमध्ये निविदा प्रसिध्दीबाबत . . .

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे निविदा विषयक संपुर्ण कामकाज ई-निविदा संगणक प्रणालीद्वारे चालते. तसेच महानगरपालिकेमार्फत निविदा प्रसिध्दी वृत्तपत्रांबरोबरच मनपाचे संकेतस्थळावरही प्रसिध्द करणेत येतात. सद्यस्थितीत मनपाचे विविध विभाग निविदा नोटीस मनपाचे संकेतस्थळावर प्रसिध्द करणेसाठी ई-मेलद्वारे माहिती व तंत्रज्ञान विभागास कळवितात व त्यानुसार माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत सदरच्या निविदा ई-मेल प्राप्त झालेनंतर त्याचदिवशी संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येतात. तसेच वृत्तपत्रांमध्ये व मनपा संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आलेली निविदा निविदाधारकांना ई-निविदा संगणक प्रणालीद्वारे सादर करणेकरीता संबंधित विभागामार्फत आवश्यक ती कार्यवाही करणेत येते.

विविध विभागांमार्फत प्रसिध्द होणा-या निविदा ह्या मनपा संकेतस्थळावर प्रसिध्द करणे तसेच ई-निविदा संगणक प्रणालीमध्ये सदरची निविदा समाविष्ठ करणे इत्यादी कामकाज संबंधित विभागामार्फत करणे आवश्यक आहे. तथापि, माझे असे निदर्शनास आले आहे की, वृत्तपत्रामध्ये तसेच मनपा संकेतस्थळावर निविदा प्रसिध्द केल्यानंतर सदरची निविदा ई-निविदा प्रणालीमध्ये विलंबाने समाविष्ठ केल्याने सदरची निविदा ठेकेदारांना सादर करण्यास अडचण निर्माण होते.

तरी या परिपत्रकान्वये सर्व विभागप्रमुखांना कळविणेत येते की, मनपा संकेतस्थळावर निविदा प्रसिध्द करणे व संदरची निविदा ई-निविदा संगणक प्रणालीमध्ये समाविष्ठ करणे बाबतचे कामकाज संबंधित विभागामार्फत करणेत यावे. मनपा संकेतस्थळावर व ई-निविदा प्रणालीमध्ये सदरची निविदा दिसत असलेबाबतची खातरजमा संबंधित विभागांमार्फत करणेत यावी. उपरोक्त बाबत प्रशिक्षणाची आवश्यकता असल्यास माहिती व तंत्रज्ञान विभागाशी संपर्क साधावा.

**मनपाच्या संकेतस्थळावर निविदा संबंधित विभागामार्फत प्रसिध्द करणेसाठी आवश्यक ती सुविधा संकेतस्थळावर निर्माण करणेत आलेली असून सर्व संबंधित विभागांना त्याबाबतचे User ID व Password ई-मेलद्वारे पाठविणेत येतील. संकेतस्थळावर निविदा प्रसिध्द करावयाचे कामकाजाचे प्रशिक्षण माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत देणेची व्यवस्था करणेत आलेली आहे.** तरी विभागप्रमुखांनी आपल्या विभागातील सदरचे कामकाज करणा-या कर्मचा-यांना माहिती व तंत्रज्ञान विभागामध्ये दि. ०५/०३/२०१८ ते दि. ०९/०३/२०१८ या कालावधीमध्ये दू. ४.०० ते ५.०० वाजेपर्यंत प्रशिक्षणास उपस्थित राहणेबाबतच्या सूचना द्याव्यात. तसेच उपरोक्त प्रमाणे ई-निविदा मनपाच्या संकेतस्थळावर प्रसिध्दी बाबतचे कामकाज संबंधित विभागांमार्फत दि १२/०३/२०१८ पासून करणेत यावे.

**आयुक्त**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका,**
**पिंपरी ४११ ०१८**

**प्रत** - सर्व संबंधित विभाग